# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. ५ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि.५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी गणित व संख्याशास्त्रातील नवीन प्रवाह (रिसेंट ट्रेंडस् इन मॅथमॅटिक्स ॲण्ड स्टॅटिस्टिक्स) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

पीएम उषा अंतर्गत ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असून देश व विदेशातील अनेक संशोधक, गणिततज्ज्ञ यामध्ये सहभागी होणार आहेत.विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी बेंगळूरुच्या भारतीय विज्ञान संस्थेचे प्रा.अपूर्व खरे यांना प्रा.ठाकरे गौरवसंस्थेच्या वतीने दिला जाणारा गणितरत्न पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी राहतील. माजी विधानसभा अध्यक्ष अरूणभाई गुजराथी, माजी कुलगुरू डॉ.के.बी.पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर प्रा.खरे यांचे बीजभाषण होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा.पी.वीरमणी उपस्थित राहतील.

उद्घाटनानंतर दिवसभर विविध सत्र होणार असून त्यामध्ये प्रा. शाकीर अली, प्रा.एस.आर.घोरपडे, अरम रोबर्ट, प्रा.परमेश्वर पंडीत,प्रा.ज्योती देवेचा,प्रा.मुहमत कुरुले, डॉ.पाडी फस्टर,प्रा.व्ही.बी.घुते, प्रा.आरती राजगुरू, प्रा.वाय.एम.बोरसे, प्रा.शैलजा देशमुख,प्रा.डी.डी.पवार, प्रा.शारदा भट, प्रा.बी.एस.देसले, प्रा.जी.डी.केदार, प्रा. तिर्थंकर घोष आदी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी शोधनिबंधाचे वाचन होईल. शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी विविध सत्रांमध्ये मान्यवरांचे मार्गदर्शन होणार असून सायंकाळी परिषदेचा समारोप होणार आहे. अशी माहिती गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा या परिषदेचे अध्यक्ष प्रा.के.एफ.पवार यांनी दिली.

बातमी क्र. २

जळगाव दि.५ ( प्रतिनिधी) :- योग्य आहार, नियमित व्यायाम आणि शरीराची योग्य काळाजी घेतल्यास कर्करोगावर मात करता येते असे प्रतिपादन डॉ.गीतांजली ठाकुर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात केले.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्यावतीने कर्करोग दिनानिमित्त् डॉ. गीतांजली ठाकुर यांचे स्तन कॅन्सर जनजागृती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी व्य.प.सदस्य डॉ. पवित्रा पाटील होत्या. डॉ.ठाकुर म्हणाल्या की दरवर्षी पावणेदोन

लाखापेक्षा जास्त स्त्रियांना स्तनाचा कर्करोग होतो. सध्या बाहेरचे खाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे देखील धोका वाढला आहे.  पुरेशी झोप, मुबलक पाणी, मासिकपाळीत शरीराची काळजी घेणे गरजेचे आहे. शिल्लक राहिलेले अन्न साठवून खाल्ल्यामुळे देखील कर्करोगाचा धोका बळावतो असे डॉ.ठाकुर म्हणाल्या. यावेळी मंचावर शैलजा माहेश्वरी, सुनीता इंगळे, अधिसभा सदस्य सुरेखा पाटील उपस्थित होते. विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुभाष पवार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. सुरेखा पाटील यांनी आभार मानले.

बातमी क्र. ३

जळगाव दि.५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेअंतर्गत डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने दि. ६ व ७ फेब्रुवारी रोजी रमाई आंबेडकर जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

गुरूवार दि. ६ फेब्रुवारी रोजी अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांच्या हस्ते उद्धाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अजय पाटील राहतील. विभागप्रमुख डॉ.राकेश रामटेके, डॉ.उमेश गोगडीया यांची उपस्थिती असणार आहे. उद्धाटनानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धा होईल. दि. ७ फेब्रुवारी रोजी काव्यवाचन व गीत गायन स्पर्धा होईल. दुपारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे अशी माहिती डॉ. विजय घोरपडे यांनी दिली.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनंसपर्क अधिकारी